# आयुषमान भारत योजना : एक अभ्यास

डॉ. वर्षा कुकडे
सहाय्यक प्राध्यापक
अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर

**सारांश :**

*भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या, भौगोलिक दृष्ट्या विविधता असलेल्या आर्थिक विकसनशिल देशात आजही कर्क रोग, हृदय रोग यासारख्या प्राणघातक रोगांवरील उपचार घेणे भारतातील गरीब व सर्वसामांन्यांच्या अवाक्या बाहेर आहे. भारतात सर्वसाधारणपणे स्वास्थ्य आणि आरोग्ययोजने अंतर्गत शासकीय, निमशायकीय, खाजगी अशा अनेक योजनांचा समावेश होतो. यात स्वास्थ्य विमा योजनेचाही अंर्तभाव आहे. देशातील सर्वांना आरोग्सेवा मिळणे ही काळाची गरज आहे. याचाच विचार करून भारत सरकारने "आयुषमान भारत योजना" सुरू केली. याच योजनेचा उहापोह करण्याचा प्रयत्न या अभ्यासात्मक शोधनिबंधात केला आहे.*

**प्रस्तावना :**

कुठल्याही देशाची सामाजीक व आर्थिक प्रगती ही तिथल्या लोकांच्या आरोग्य या वरही अवलंबून असते. सरकारी कर्मचारी ते सर्वसाधारण लोकांपर्यंत आरोग्य सेवा तसेच AIDS सारख्या रोगांसंबंधी जनजागृती अभियान, माता आणि बालसंगोपन, कुटुंब नियोजन आणि लसीकरण या सारखे अनेक कार्यक्रम केंद्र व राज्य सरकार द्वारा राबविल्या जातात. भारतात चांगली स्वास्थ्यसेवा, रोगनिदान व विविध उपचार पध्दती आहेत. चांगली शासकीय, निमशायकीय, खाजगी तसेच धर्मदाय संस्थेमार्फत चालविलेली रुग्णालये सुध्दा आहेत. असे असतांना आजही दारिद्रय रेषेखालील तसेच ग्रामिण लोकांना त्याचा लाभ मिळू शकत नाही. भविष्यात कुठल्याही असाध्य रोगांवर चांगले व वेळेवर उपचार मिळण्यासाठी सरकारी व खाजगी अरोग्यविम्याची तरतुद करुन ठेवता येते आणि बरेच लोक तसे करतातही पण मोलमजुरी करणारा गरीब व ग्रामिण आरोग्य विम्यासारखी तरतुद करु शकत नाही. सर्वांना किफायती दराने आरोग्य सेवा उपलब्ध करुन **स्वस्थ भारत समृध्द भारताचे** उदिष्टय ठेवून भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदींनी २५ सप्टेंबर २०१८ पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या जंयती ला महत्वाकांक्षी "आयुषमान भारत योजना" सुरु केली.

**आयुषमान भारत योजना :** "आयुषमान भारत योजना" किंवा प्रधानमंत्री जन आरोग्य योजना ही केंद्र सरकारची एक महत्वाकांक्षी योजना आहे. ही योजना स्वास्थ्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या (Ministry of Health and Family Welfare) अंर्तगत सुरू करण्यात आली. आधीच सुरू असलेल्या राष्ट्रिय स्वास्थ्य बिमा योजना आणि सिनीयर सिटीझन हेल्थ इन्शुरन्स स्किम या योजनांचाही अंर्तभाव यात करण्यात आला आहे. या योजनेत राष्ट्रिय स्वास्थ्य योजना व कल्याणकारी केंद्रे अशा दोन प्रणालींचा समावेश होतो. पहिल्या प्रणाली अंतर्गत लाभार्थ्याला निशुल्क उपचार तर दुसऱ्या प्रणाली अंतर्गत प्राथमिक उपचार केले जातील. राज्यसरकारांना ही योजना लागू करण्याकरिता केंद्र सरकार राज्यांना आर्थिक मदत देईल.

**संशोधनाची उदिष्टये :**

आयुषमान भारत योजनेच्या वैशिष्टयांचा अभ्यास करून त्याची अदय्ययावत माहिती करून घेणे.

**मुख्य वैशिष्ट्ये :**

- या योजने अंर्तगत येणाऱ्या लाभार्थ्याच्या मर्जीनुसार देशातील कोणत्याही शासकिय आणि शासनाच्या या योजनेत अंगिकृत खाजगी रूग्णालयात द्वितीय व तृतिय स्तरावरील आरोग्यसेवेचा लाभ निशुल्क / संगणीकृत (Cashless/Paperless) घेता यतो.
- या योजने अंर्तगत येणाऱ्या लाभार्थ्याच्या कुटुंबाला दरवर्षी ५ लाखापर्यंत आरोग्यविमा पुरविल्या जाईल.
- या योजनेकरीता लाभार्थ्याची पात्रता २०११ च्या समाजिक आर्थिक जातीगणनेच्या डेटाबेस वर आधारीत आहे.
- सदर योजने अंर्तगत येणाऱ्या रूग्णालयात आरोग्य मित्रांची सोय करण्यात आली आहे. हे आरोग्यमित्र लाभार्थि रूग्णांची नोंदणी, उपचारा दरम्यान त्यांचे साहाय्य व मार्गदर्शन करतात.
- या योजनेतील लाभार्थी हा ग्रामिण तसेच शहरी असू शकतो.
- ही योजना इतर आरोग्य विमा योजनेपेक्षा वेगळी आहे यात पुर्व विदयमान रोगांसाठी प्रतिक्षा कालावधी आहे.
- एकदा या योजनेत लाभार्थि म्हणून समाविष्ट झाल्यानंतर रूग्णांना या योजनेचा लाभ मिळतो. या योजने अंर्तगत कुटुंबातील कोणत्याही व कितीही लोकांना या योजनेचा

लाभ मिळू शकतो. तसेच रूग्णाला त्याच्या मर्जीनुसार कोणत्याही उपचार पध्दतीने म्हणजेच ॲलोपॅथी, आयुर्वेद, युनानी, होमियोपॅथी पध्दतीने उपचार घेऊ शकतो.

- या योजनेत बऱ्याच रोगांना समाविष्ट करण्यात आले आहे त्यावरील उपचार व रूग्णलयात भर्ती होण्याच्या पुर्विचा व नंतरचा खर्च समाविष्ट आहे. स्वास्थ्य मंत्रालयाने या योजनेत १३००च्या वर पॅकेज समाविष्ट केले आहेत. यात रोगनिदान, उपचार, वैद्यकिय सेवा, शस्त्रक्रिया, डायलेसिस, औषधे तसेच वाहतुकिचा खर्च याचा समावेष आहे.

**ग्रामिण लाभार्थी :**

सदर योजनेचा लाभ घेण्याकरिता अटी खालीलप्रमाणे आहेत.

- कच्चे घर, कुटुंबात कोणीही वयस्कर व्यक्ति (१६ ते ५९ वर्ष) नसणे, कुटुंबप्रमुख स्त्री असेल, कुटुंबात एकही व्यक्ति अपंग असेल किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग असेल.
- याशिवाय बेघर, निराश्रित, भिकारी, आदिवासी

**शहरी लाभार्थी :**

- भिकारी, घरकाम करणारे, दुकानदार, मोची, फेरीवाले, पटवारी, सफाई कामगार, मजदूर, शिंपी, ड्राइवर, सिक्युरिटी गार्ड, रिक्षा चालक, दुकानात काम करणारा, सडकेवर काम करणारे, प्लंबर, राजमिस्त्री, वेल्डर. कूली. इत्यादी.

योजनेत सहभगी होण्याकरिता ऑनलाईन किंवा ऑफलाईन आवेदन करता येते. ऑनलाईन आवेदनकरण्यारिता

आयुषमान भारत योजनेच्या अधिकृत वेबसाईट www.abnhpm.gov.in वर करता येते.किंवा आवेदन फॉर्म डाऊनलोड करून त्यात माहिती भरून जवळच्या सरकारी स्वास्थ्य केंद्रात जमा करता येतो.

आधार कार्ड, शिधापत्रिका किंवा मतदान ओळख पत्र यापैकी कोणतेही एक ओळख पटविण्याकरिता आवश्यक असते. आपले नाव लाभार्थ्यांच्या यादीत समाविष्ट झाले किंवा नाही हे पाहण्याकरिता आयुषमान भारत योजनेच्या अधिकृत वेबसाईटवर पाहू शकतो. कुठल्याही प्रकारच्या शंकेचे निराकरण करण्या करिता हेल्पलाईन नंबर १४५५५ (14555) चा उपयोग करता येतो.

आरोग्य मित्र व हेल्प डेस्क चा उपयोग करून रूग्णांना मदत करणे सापे होते. मोदी केयर नावाने ओळखल्या जाणारी ही योजना जगातली सगळ्यात मोठी आरोग्य विमा योजना आहे.

**माहिती संकलन व संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधात माहितीचा स्त्रोत हा द्वितिय असून वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**निष्कर्श :**

आयुषमान भारत योजना भारतातील गरीब लोकांकरिता जीवनदायीनी ठरू शकते. जर भरता साररख्या विशाल लोकसंख्येच्या देशात गोर गरिबांचेही आरोग्य सुधारले तर आर्थिक व सामाजिक अस्थिरता दूर होईल. देशाच्या भरभराटीत वाढ होवून राहणीमान उंचावेल. तसेच आरोग्य मित्र, हेल्प डेस्क प्रधानमंत्री जन आरोग्याचे कॉल सेंटर यामुळे वैद्यकिय, विमा व तंत्रज्ञान क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होतील.

**संदर्भसुची :**

1. https://www.india.gov.in/spotlight/ayushman-bharat-national-health-protection-mission
2. http://economictimes.indiatimes.com/hindi/wealth/personal-finance
3. http://mera.pmjay.gov.in/search/login
4. https://ayushmanyojana.in/ayushman-bharat-yojana-how-to-apply-online-application-form- ऑनलाईन–आवेदन/
5. https://ayushmanyojana.in/ayushman-bharat-yojana-beneficiaries-list-लाभार्थिलिस्ट
6. Portal of India
7. https://en.wikipedia.org/wiki/Ayushman_Bharat_Yojana